14-03-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) B

VTG/ 14:10

14-03-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A 1

SDU/ MHM/ SBT. 14:05

(सभापतीस्थानी मा. सभापती)

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदेमातरम्" या गीताच्या गायनाने झाला.

पृ.शी./मु.शी. : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत पटलावर ठेवणे.

सचिव : महोदय, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत आज, दिनांक 14 मार्च 2005 रोजी राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत मी सभागृहापुढे ठेवतो.

सभापती : विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(सोबत जोडलेले अभिभाषण छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SDU/ MHM/ SBT.

पृ.शी. : राज्यपालांच्या अभिषणाबद्दल आभार प्रदर्शन.

मु.शी. : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन करणारा श्रीमती सुधा जोशी यांचा प्रस्ताव.

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडते : -

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : अध्यक्ष महाराज, श्रीमती सुधा जोशी यांनी मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास मी दुजोरा देतो.

सभापती : प्रस्ताव असा आहे की, :-

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

बुधवार, दिनांक 16 व गुरूवार, दिनांक 17 मार्च 2005 रोजी या प्रस्तावावर चर्चा होईल.

या प्रस्तावास ज्या सदस्यांना सुधारणा सुचवावयाच्या असतील त्यांनी त्या मंगळवार, दिनांक 15 मार्च 2005 रोजी दुपारी 12.00 वाजेपर्यंत विधानमंडळ सचिवालयाच्या परिषद शाखेत आणून द्याव्यात.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SDU/ MHM/ SBT.

पृ.शी. : शोक प्रस्ताव.

मु.शी. : श्री. पी. व्ही. नरसिंह राव, माजी पंतप्रधान यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव.

श्री.आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) : महोदय, श्री.पी.व्ही.नरसिंह राव, माजी पंतप्रधान यांच्या निधनाबद्दल मी खालील शोकप्रस्ताव मांडतो :-

"श्री.पी.व्ही.नरसिंह राव, माजी पंतप्रधान यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

(प्रेस : येथे सोबत जोडलेले भाषण छापावे.)

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ..

त्यांचा महाराष्ट्राशी नेहमीच जिव्हाळयाचा सबंध राहिला होता. कै. नरसिंह राव यांचे शिक्षण नागपूरमध्ये झाले होते. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व त्यांनी लोकसभेमध्ये केले होते. सभापती महोदय, अशा एका सामर्थ्यशाली नेत्याच्या दु:खद निधनाबद्दल मी दु:ख व्यक्त करतो. त्याचबरोबर त्यांना श्रध्दाजंली अर्पण केल्यानंतर सदनाचे आजचे कामकाज तहकूब करावे अशी सदनाला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2..

श्री.नितीन गडकरी (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, आपल्या देशाचे माजी पंतप्रधान कै.नरसिंह राव यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्याचा प्रस्ताव माननीय उपमुख्यमंत्र्यांनी मांडला आहे त्याला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कै. नरसिंह राव हे एक थोर विचारवंत , कुशल प्रशासक व संवेदनशील साहित्यिक होते. महाराष्ट्राशी तसेच मराठी संस्कृतीशी त्यांचा जवळचा संबंध होता. कै. वि.स. खांडेकर यांनी लिहिलेल्या " ययाती " या कादंबरीचा त्यांनी तेलुगु भाषेत अनुवाद केला होता. अतिशय सुसंस्कृत आणि संवेदनशील असे साहित्यिक म्हणून त्यांचा साहित्यिक क्षेत्रात परिचय होता. एवढेच नाही तर ज्यावेळी मराठी साहित्य संमेलन झाले होते त्यावेळी त्या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून त्यांच्यावर जबाबदारी टाकण्यात आली होती.संस्कृत,मराठी,हिन्दी,इंग्रजी,उर्दू,तेलुगु इत्यादी भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. नागपूरच्या लॉ कॉलेजमधून त्यांनी लॉची पदवी घेतली होती. नागपूर युनिर्व्हसिटीबरोबर सुध्दा त्यांचा जवळचा संबंध होता.त्या पिढीतील नागपूरमधील अनेकांबरोबर त्यांचा अतिशय जवळून परिचय होता. एक सुसंस्कृत राजनितीज्ञ म्हणून देशात त्यांनी आपली प्रतिमा निर्माण केली होती. तसेच स्वातंत्र्य लढयात त्यांचे महत्वपूर्ण योगदान होते. सर्वात महत्वाची गोष्ट अशी आहे की, आज जसा आपला फॉरिन एक्सचेंजचा स्टॉक आहे तसा त्यावेळी नव्हता. ज्यावेळी कै. नरसिंह राव पंतप्रधान होते त्यावेळी देशाची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. आजचे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग रिझर्व्ह बॅन्केचे गव्हर्नर या पदावरुन निवृत्त झाल्यानंतर त्यांना कै. नरसिंह राव यांनी आपल्या कॅबिनेट मध्ये अर्थमंत्री म्हणून घेतले होते. तेव्हा त्यांनी या देशात आर्थिक सुधारणांचा पाया सर्व प्रथम टाकला होता. या देशात ज्यावेळी त्यांनी खुले आर्थिक धोरण स्वीकारले होते त्यावेळी त्याची फार चर्चा झाली होती.

नंतर श्री.सुंबरे

अशुधीत मत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. गडकरी (पुढे चालू ...

त्यातील काही धोरणांबाबत कदाचित वाद होऊ शकतात परंतु त्यांच्या काळामध्ये ज्या आर्थिक सुधारणा देशामध्ये आणल्या गेल्या त्याचाच परिणाम म्हणून आज देशाची आर्थिक परिस्थिती अनेक पटीने चांगली आहे. राजकारणामध्ये अनेक वादळे आली. झारखंड मुक्ती मोर्चाचे श्री.शिबू सोरेन यांचे त्यांच्या काळातील प्रकरण वगैरे जो भाग आहे हा त्यांच्या आयुष्यातील एक दुर्दैवी भाग होता. परंतु पुढे त्या प्रकरणातून देखील ते निर्दोष सुटले. त्यांच्या राजकीय जीवनाचे एक आत्मचरित्रच असलेले 'इन सायडर' हे पुस्तक त्यांनी लिहिले आणि ते एक अतिशय सुंदर असे आत्मचरित्र ठरलेले आहे. त्याचे प्रकाशन सन्माननीय श्री.अटलबिहारी बाजपेयी यांनी केले त्यावेळी त्यांनी केलेल्या भाषणामध्ये आणि त्यानंतर श्री.नरसिंह राव यांनी केलेल्या भाषणामध्ये दोघांनीही एकमेकांबद्दल काढलेले उद्‌गार अतिशय चांगले होते.. एकूणच त्यावेळची त्या दोघाही नेत्यांची झालेली भाषणे ही अतिशय अप्रतिम अशीच होती. माननीय सभापती महोदय, महाराष्ट्रातील राजकारणाशी देखील त्यांचा अत्यंत जवळचा संबंध होता. किंबहुना श्री.सुधाकररावजी नाईक हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना नागपूर जिल्ह्यातील रामटेक ह्या लोकसभा मतदारसंघातून ते लोकसभेवर निवडून गेले होते आणि त्या वेळी त्यांनी त्या मतदारसंघामध्ये अनेक विकासाच्या दृष्टीने निर्णय घेतले आणि मदतही केली आहे. त्या नंतर रामटेक येथे कालिदास संस्कृत विद्यापीठ स्थापन झाले त्यावेळी त्यांना मोठा आनंद झाला होता. त्यावेळी डॉ.श्रीकांत जिचकार यांच्या वनमॅन कमिटीने हे संस्कृत विद्यापीठ रामटेक येथे सुरू करण्याचे एक चांगले काम केले. त्याचे भारतातील किती लोकांना रेकग्निशन आहे हा भाग वेगळा पण परदेशातून विशेषत: जर्मनमध्ये देखील त्याची फार मोठी विचारांची देवाणघेवाण होते आहे आणि त्याचे मोठे श्रेय डॉ.श्रीकांत जिचकार यांना जाते. माननीय सभापती महोदय, श्री.नरसिंह राव हे महाराष्ट्रातून, रामटेक मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले होते आणि त्याचवेळी त्यांनी आंध्र प्रदेशमधून देखील लोकसभेची निवडणूक लढविली होती व त्यामध्ये ते पराभूत झाले होते पण रामटेक मधून मात्र ते विजयी झाले होते. त्यानंतर तत्कालीन पंतप्रधान श्री.राजीव गांधी यांचे दुर्दैवी निधन झाल्या नंतर श्री.नरसिंह राव हे देशाचे पंतप्रधान झाले आणि त्या काळात त्यांनी महाराष्ट्राच्या अनेक विकास कामांच्या, प्रश्नांच्या बाबतीत मदत केली होती. एक अतिशय सुसंस्कृत असे ते नेते होते. माननीय सभापती महोदय, आपणास कदाचित आठवत असेल की, नागपूर येथील नवीन विधानसभा

..... सी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी (पुढे चालू...

सभागृहाच्या इमारतीचे उद्घाटन झाले त्यावेळी ते नागपूरला आले होते आणि त्यावेळी त्यांनी तेथील हिरवळीवर संसदीय लोकशाही बद्दल एक अतिशय सुंदर असे भाषण केले होते. तेव्हा मी एक नवीन सदस्य होतो पण मला त्यांचे त्यावेळचे ते भाषण अतिशय आवडले होते. तर असा एक अतिशय सुसंस्कृत नेता, स्वातंत्र्य संग्रामातील एक सैनिक, थोर संवेदनशील साहित्यिक आणि कुशल राजनितीज्ञ असा त्यांचा परिचय साऱ्या देशाला आहे. त्यांच्या निधनामुळे आपल्या देशातील स्वातंत्र्य लढ्यातील एका पिढीला, एका संवेदनशील साहित्यिकाला आणि कुशल राजनितीज्ञाला देश मुकला आहे. त्यांच्या संदर्भात या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्यांच्याशी मी पूर्णत: सहमत आहे आणि मी त्यांना माझी श्रद्धांजली अर्पण करतो आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांनी या शोक प्रस्तावानंतर सभागृहाची बैठक स्थगित करण्याविषयी जो प्रस्ताव मांडला आहे त्याचे मी समर्थन करतो आणि माझे भाषण संपवितो.

****

(यानंतर श्री.जागडे .... डी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय,या सदनाचे नेते आणि मा. उपमुख्यमंत्रीमहोदय श्री. आर. आर. पाटील यांनी श्री. पी. व्ही. नरसिंह राव यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडला आहे तसेच मा. विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांनी या प्रस्तावाला पाठिंबा दिला आहे. मी सुध्दा आमच्या गटातर्फे या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी उभा आहे. मा. नरसिंह राव यांचा आणि माझा परिचय फार जुना आहे. मला आयुष्यात अनेक मोठी माणसे पहावयाला मिळाली. परंतु विद्वता आणि योगायोग हा फार क्वचित ठिकाणी आढळतो. मा.नरसिंह राव यांची आणि माझी भेट झाल्यानंतर त्यांनी 15 ते 20 मिनिटे माझ्याशी हितगूज केले होते. त्यावेळी त्यांच्या प्रत्येक शब्दात त्यांची विचारशक्ती किती दांडगी आहे तसेच त्यांची आकलनशक्ती किती दांडगी आहे हे मला दिसून आले. तसेच देशाबद्दल त्यांच्या मनात किती आपुलकी आहे, याचा मला त्यावेळी अनुभव आला होता. योग असा की, लोकसभेत त्यांच्याबरोबर काम करण्याची मला संधी मिळाली. काँग्रेसचे अनेक मोठमोठे पुढारी त्या ठिकाणी बसले होते. परंतु त्या सर्व पुढा-यांमध्ये त्यांच्याइतका दैदीप्यमान पुढारी मला आढळला नाही. त्यांची भाषणे मी लोकसभेत ऐकली आहेत. विषयांचा गाढा अभ्यास करुन अत्यंत अधिकारवाणीने आणि प्रत्येक शब्दावर जोर देऊन आपले विचार त्यांनी मांडले आहेत. त्यावेळी त्यांचे भाषण झाल्यानंतर सगळे सभागृह अवाक झाले होते. तो दिवस मी कधीच विसरु शकणार नाही. या देशावर आर्थिक संकट आले होते. आपल्या देशातील सर्व सोने परदेशात गहाण ठेवावे लागले होते. त्यानंतर या देशाची सूत्रे त्यांच्या हातात आली होती. या देशामध्ये आर्थिक सुबत्ता येण्यासाठी अतिशय धाडसाचे पाऊल त्यावेळी त्यांनी उचलले होते. अनेक लोक त्यांच्या धोरणावर टीका करतात. त्यांनी त्यावेळी धाडसाचे पाऊल उचलले नसते तर आज आपला देश कोठे गेला असता, हे सांगता येणार नाही. यासाठी त्यावेळी त्यांना जे जे शक्य होईल असे वाटले होते, ते ते सर्व काही त्यांनी केले. त्यांनी अनेकांना मंत्री केले. त्यांनी आपल्या बुध्दीमत्तेप्रमाणे निरनिराळे प्रयोग केले. परंतु त्यांच्यावर ज्या ज्या वेळी संकटे आली, त्यावेळी फार थोडेच लोक त्यांच्या बाजुने उभे राहिले. बाकी सगळ्या लोकांनी त्यांना पाठच दाखविली. अनेक लोकांनी मंत्रीपद उपभोगले असतानाही आपल्या नेत्याच्या पाठीमागे उभे राहण्याची सुबुध्दी इतर लोकांना आली नाही. त्या परिस्थितीत मी त्यांना जाऊन भेटलो. त्यावेळी मला त्यांनी असे सांगितले की, मनुष्य हा एकटाच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

जन्माला येतो आणि एकटाच निघून जातो. प्रत्येक माणसाला शेवटपर्यन्त इतर लोक साथ देतात, असे होत नाही. ज्यावेळी लोकांचा मतलब असतो, तेव्हा सर्व लोक बरोबर असतात. परंतु मतलब संपल्यानंतर साथ सोडतात. आपल्या महाराष्ट्राचे थोर सुपुत्र स्वर्गिय यशवंतराव चव्हाण यांचा जीवनातही तसाच अनुभव आला आहे. जाताना माणूस एकटाच जात असतो, परंतु त्यांचे विचार आणि त्यांचे कर्तृत्व शिल्लक राहते. मा. नरसिंह राव आपल्या रामटेक मतदार संघातून निवडून आले होते. 1992 च्या दंगलीनंतर 1993 मध्ये मा. नरसिंह राव मुंबईत आले होते. त्यावेळी आम्ही त्यांना भेटलो होतो. आमची जी भूमिका होती, त्यांना ती आम्ही समजावून सांगितली होती. त्यांनी अतिशय आपुलकीने सगळा विषय समजावून घेतला होता. एवढेच नाहीतर त्यांनी त्यावेळी आमच्या भागाला भेटही दिली होती. माझ्या नजरेसमोर अनेक स्मृती आहेत. परंतु मला एक दु:ख आहे. आयुष्यभर देशाच्या स्वातंत्र्यांसाठी तसेच निजामापासून तसेच निजामशाहीपासून मुक्त होण्यासाठी आणि देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर या देशाची सर्व खाती मजबूत होण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. आंध्र प्रदेशासाठी त्यांनी प्रयत्न केले तसेच देशासाठीही प्रयत्न केले. संरक्षण मंत्री तसेच विविध खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी काम केले आहे. ते जेव्हा या देशाचे पंतप्रधान झाले, त्यावेळी अतिशय प्रतिकूल परिस्थिती या देशाची होती. त्यावेळी अतिशय स्थितप्रज्ञासारखे ते वागले. त्यवेळी मा.मनमोहनसिंह यांच्यासारखा साथीदार त्यांना मिळाला, त्यामुळे या देशाला आर्थिक स्थैर्य लाभले. नरसिंह राव हे अतिशय मितभाषी होते. परंतु त्यांच्यावर संकटे आल्यानंतर अनेक चांगले मित्र त्यांना सोडून गेले. असा अनुभव त्यांना आपल्या जीवनात मिळाला.

(यानंतर श्री. सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

याचे दु:ख आमच्या सारख्या त्यांच्या चाहत्यांना झाल्याशिवाय रहात नाही. हे दु:ख मला याठिकाणी व्यक्त करण्याची संधी मिळाली. त्यांच्या अनेक गोष्टींवर मी याठिकाणी भाष्य करु शकतो, परंतु ते आज करणार नाही. कारण ते आज आपल्यामध्ये नाहीत. तसे त्यांना वयाच्या 84-85 वर्षापर्यंत भरपूर आयुष्य लाभले. काही काळ ते आजारी होते. परंतु या सर्व संकटामधून ते मुक्त झाले. त्यांच्या निधनाने आपण या देशाचा थोर सुपुत्र गमावला आहे. 13-14 भाषांवर प्रभुत्व असलेले कै. नरसिंह राव हे अतिशय बुध्दीमान होते. मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून आपण त्यांना महाराष्ट्रात आणले. त्यांनी त्यावेळी मराठीमध्ये केलेले भाषण आपल्या मराठी भाषेला नवी दिशा देणारे आहे हे विसरुन चालणार नाही. देशाला ज्यावेळी अशा माणसांची गरज असते त्यावेळी अशी माणसे या देशातून अंतर्धान पावतात. पण त्यामुळे एकच गोष्ट होते की, त्यांची स्मृती चिरकाल, चिरंतन रहाते. मी स्वर्गीय नरसिंह राव यांना आपल्या पक्षातर्फे, विरोधी पक्षातर्फे विनम्र श्ब्दामध्ये श्रध्दांजली अर्पण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी माजी पंतप्रधान कै. पी. व्ही. नरसिंह राव यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडला आहे त्याबाबत व्यक्तिश: माझ्या सद्भावना व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. स्वातंत्र्य आंदोलनामध्ये काम करणाऱ्या थोर नेत्यांपैकी एक नेता आपल्यातून निघून गेला आहे. हे जसे खरे आहे तसेच, स्वातंत्र्य आंदोलनामध्ये काम करणाऱ्या मोठया नेत्यांमध्ये दोन प्रमुख भाग आहेत. एक म्हणजे भारतीय स्वातंत्र्य आंदोलन, आणि दुसरे म्हणजे नेटीव्ह किंवा ज्याला आपण संस्थाने म्हणतो तेथील आंदोलन तुलनेने कठीण होते असे मानणारा मी आहे. याचे कारण भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाला त्यावेळी महात्मा गांधीजी सारखे उत्तुंग नेते लाभले होते, मोठ मोठया माणसांची अशी श्रध्दा होती की तिथून जो आदेश येईल त्याप्रमाणे आपण करु. त्या करिता आपण विचार करीत बसण्याची ही गोष्ट नाही. त्यामुळे त्या थोर नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली भारतातील स्वातंत्र्य आंदोलन चालत होते. पण याच्या विपरीत अशी परिस्थिती नेटीव्ह स्टेटमध्ये किंवा ज्याला आपण संस्थाने म्हणतो त्याठिकाणी होती. कारण स्थानिक राजे सर्वच चांगले नव्हते. काही अत्यंत चांगले होते तर काही अत्यंत वाईट होते. लहान मोठे, वेगवेगळया विचारांचे स्थानिक निर्णय घ्यायचे आणि आंदोलन पुढे चालवायचे. या नेटीव्ह स्टेटमध्ये सर्वात कठीण राज्यामध्ये कै. पी.व्ही. नरसिंह राव हे काम करीत होते. त्या काळात जवळ जवळ सहाशेच्या जवळपास या संस्थानांची संख्या होती. आणि भारतीय स्वातंत्र्याचा जो 1947 चा कायदा झाला त्या कायद्याने त्यांना मोकळीक देऊन टाकली होती. स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली instrument of accession "सामीलनामा" या नावाचा एक कागद तयार करण्यात आला. आणि त्यानंतर या संस्थांनाचा प्रश्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली मिटला. त्यांच्या विभागाचे मेनन नावाचे एक सचिव होते. त्यांनी "Story of integration if Indian States" या नावाचे पुस्तक लिहिले आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, या सर्व कामांमध्ये आम्ही यशस्वी झालो, परंतु तीन संस्थाने अजून शिल्लक राहिली आहेत. त्यापैकी 1) काश्मीर 2) जुनागढ आणि 3) हैद्राबाद. जुनागढचे राजे पाकिस्तानात निघून गेले. काश्मीरच्या बाबतीत राजे हरिसिंग यांची काही अडचण होती, परंतु आक्रमणामुळे ती अडचण मिटली. आणि शेवटचे हैद्राबाद संस्थान.... म्हणजे देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी आपल्या संस्थानिकांविरुध्द उभ्या राहिलेल्या आंदोलनाचे नेतृत्व करण्याचे भाग्य जसे त्यांना लाभले, त्याप्रमाणे हैद्राबादमध्ये झालेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख...

पोलीस ॲक्शनमध्ये शेवटचे संस्थान विलीन झाले. त्या कामामध्ये ज्या थोर नेत्यांनी अतिशय महत्वाची कामगिरी बजावली त्यामध्ये नरसिंह राव यांचा समावेश होतो.

सभापती महोदय, दुसरी एक महत्वाची गोष्ट सांगितली पाहिजे. मला त्यांच्या समवेत प्रत्यक्ष दोन वेळा काम करण्याची संधी मिळाली. कितीही तणावाचा प्रसंग असला तरी बैठक सुरु करतांना एका वाक्यामध्ये ते सारा तणाव मुक्त करीत असत. नवीन शैक्षणिक धोरणाच्या संदर्भात त्यांनी वर्धा येथे शिक्षक प्रतिनिधींची बैठक बोलाविली. नवीन नॅशनल एज्युकेशन पॉलिसी त्यांच्या डिपार्टमेंटने आणली. डिपार्टमेंटने ती पॉलीसी तयार करतांना त्यामध्ये अनेक उलट सुलट गोष्टी आणल्या होत्या. म्हणून या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या सर्व लोकांची एक बैठक त्यांनी वर्ध्याला बोलाविली. या सभागृहातील सर्व शिक्षक प्रतिनिधी आणि आमदार हे त्या बैठकीला उपस्थित होते. मीही त्याठिकाणी उपस्थित होतो. त्यांनी त्यावेळी सर्व तणाव लक्षात घेतले होते. आणि त्यांनी पहिल्या वाक्याने सुरुवात केली. What is wrong with the present educational system? या देशाच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये काहीही दोष नाही हे मी पहिल्यांदा सांगू इच्छितो. याच व्यवस्थेमधून आमचे नेते निर्माण झाले आहेत. अशाप्रकारे त्यांनी सुरुवात केल्यानंतर सर्व तणाव मुक्त झाले. आणि त्यानंतर त्या बैठकीमध्ये दोन दिवस चर्चा झाली. ते थोर स्वातंत्र्य सेनानी होते, थोर शिक्षण तज्ज्ञ होते. त्यांची दीर्घ अशाप्रकारची संसदीय कारकीर्द होती. ते मंत्री होते, विधानमंडळाचे सदस्य होते.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख . . . .

विधानमंडळाचे सदस्य होते, मुख्यमंत्री होते. अनेक खात्याचे मंत्री होते आणि अतिशय कठीण प्रसंगामध्ये या देशाचे पंतप्रधान होते आणि भाषा प्रभू म्हणून त्यांचे एक स्थान होते, इतक्या भाषांमध्ये सहज आणि लिलया बोलणारा, एवढया भाषांवर प्रभुत्व असणारे ते एक थोर नेते होते. खरे म्हणजे राजकारणाच्या झटापटीमध्ये भाषा प्रभुत्व टिकविणे ही मोठी कठीण गोष्ट आहे. पण अनेक भाषांवर प्रभुत्व टिकविणारे असे ते थोर नेते होते. ते आपल्यातून निघून गेले आहेत. मी त्यांना मनापासून श्रध्दांजली अर्पण करतो.

. . . .एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी स्व.पी.व्ही.नरसिंह रावसाहेबांच्या दु:खद निधनाबद्दल श्रध्दांजली वाहण्यासाठी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्यासंबंधी माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, स्व.नरसिंह राव हे थोर स्वातंत्र्यसेनानी, उत्तम प्रशासक, साहित्य प्रेमी आणि साहित्यिक, बहूभाषा प्रमुख, एक सुस्वभावी, सुसंस्कृत राजकारणी आणि सामान्य माणसाचे दु:ख जाणणारा एक महान माणूस असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. माझ्या सुदैवाने मी ज्यावेळी महाराष्ट्र युवक काँग्रेसचा अध्यक्ष होतो, तेव्हा अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीस पदावर नुकतीच सन्माननीय श्री.नरसिंह राव यांची नियुक्ती झाली होती आणि युवक काँग्रेस, सेवादल या ज्या दोन काऊन्टर ऑर्गनायझेशन आहेत, त्याची संपूर्ण संघटनात्मक जबाबदारी आदरणीय श्री.नरसिंह रावसाहेबांवर होती. त्यामुळे त्यांचा आणि आमचा वैयक्तिक संपर्क वाढला. त्या संपर्कामधून माननीय श्री.नरसिंह रावसाहेबांचे व्यक्तीत्व, त्यांचे विविध पैलू हे माझ यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांच्या लक्षात आले. आताच अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आाणि सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी उल्लेख केल्याप्रमाणे आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होण्यापूर्वी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली "हैद्राबादच्या मुक्ती" संग्रामामध्ये ज्या अनेक दिग्ग्ज नेत्यांनी भाग घेतला त्यामध्ये कै.नरसिंह रावसाहेब होते, कै.शंकरराव चव्हाण होते, कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री कै.विरेंद्र पाटील, जी. व्यंकट स्वामी देखील होते. अशा अनेक नामवंत नेत्यांनी स्वामी रामांनद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली हा लढा अतिशय प्रभावीपणे लढविला आणि भारतीय स्वातंत्र्यांच्या लढयाच्या इतिहासात "हैद्राबादच्या मुक्ती" संग्रामाचे एक वेगळे पर्व म्हणून त्याची नोंद घेतली गेली. त्या लढयातील अग्रणी नेते म्हणून आणि त्यानंतर आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी थोडया अवधीसाठी काम केले. पण ते अत्यंत महत्वाचे होते. मात्र त्यांना कशासाठी राजीनामा द्यावा लागला ? हे याठिकाणी नमूद केले पाहिजे. तेलंगणा हा जो भाग आहे, तो सरंजामशाहीचा, जमीनदारांचा प्रभाव असलेला आहे. त्याठिकाणचे जमीनदार हे हजारो एकराचे मालक होते आणि सन्माननीय नरसिंह रावसाहेबांनी त्याठिकाणी लॅण्ड रिफॉर्म बिल आणले. जमीन सुधारणा कायदा केला आणि त्यामुळे श्रीमंत सरंजामशाही सरदार, जमीनदार यांनी कट-कारस्थान करुन, प्रभाव आणून, दबाव आणून कुटील कारस्थानाने एक शक्ती निर्माण केली आणि श्री.नरसिंह राव यांना या कारणासाठी राजीनामा द्यावा लागला. गरीब, सामान्य माणूस म्हणजे शेती आणि

. . . .एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार . . . .

सरंजामशाही यातील अंतर हे रावसाहेबांनी ओळखले आणि त्याविरुध्द त्यांनी कायद्याच्या रुपाने लढा दिला आणि त्यामुळे त्यांना आपले मुख्यमंत्रीपद गमवावे लागले. मग ते अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस झाले. स्वातंत्र्य लढयापासून सामान्य माणसाकरता संघर्ष करणे, लढा देणे, ज्यांच्या न्यायासाठी महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्य मिळवून दिले आहे त्याचा पाठपुरावा करणे ही खूणगाठ माननीय रावसाहेब यांच्याकडे होती, याची जाणीव आपण सर्वांनी ठेवली पाहिजे. हे सर्व करीत असताना मघाशी सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी सांगितले ते अगदी बरोबर आहे. त्यांनी अनेक खात्याचे मंत्रीपद सांभाळले. मला एक प्रसंग आठवतो. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून ते मॅथमॅटीक्स घेऊन उत्तम डिक्स्टींगशनमध्ये बी.एस्सी (ऑनर्स) झाले आणि नंतर लॉ करण्यासाठी ते नागपूरला गेले. जेव्हा फर्ग्युसन कॉलेजची शताब्दी होती. तेव्हा ते मनुष्यबळ संसाधन खात्याचे मंत्री होते, आताचे ते शिक्षण खात आहे. ते या समारंभासाठी पुण्यामध्ये आले, तेव्हा मी त्यांच्या स्वागतासाठी गेलो होतो. नंतर मग फर्ग्युसन कॉलेजच्या समारंभाला गेलो. त्यावेळचा प्रसंग अजूनही माझ्या डोळयासमोर उभा आहे. ते पंतप्रधान झाल्यानंतर मी त्यांच्याबद्दल लिहीले होते, तेव्हा त्यात याचा उल्लेखही केला होता. त्या समारंभाच्या वेळी त्यांना मॅथमॅटीक्स शिकविणारे प्रो.चंद्रात्रे, ज्यांचे वय 90 होते, ते समोर पुढच्या रांगेमध्ये बसले होते आणि चंद्रात्रे सरांच्या पाठिमागे मी बसलो होतो, अनेक लोक त्या समारंभामध्ये बसलेले होते. रावसाहेबांनी व्यासपीठावर गेल्याबरोबर चंद्रात्रे सरांना पाहिले आणि ते समारंभ सोडून व्यासपीठावरुन खाली उतरले.

यानंतर श्री.तलमले . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(पूर्वी सौ.रणदिवे..

श्री. उल्हास पवार (पुढे सुरु..

प्रिंसिपॉल बाळ गाडगीळ यांना कळलेच नाही की, रावसाहेब खाली कां उतरले? ते तत्परतेने खाली आले, चंद्रात्रे साहेबांसमोर आले आणि त्यांच्या पाया पडले आणि सरांना विचारले,सर, तुम्ही मला ओळखले काय? मी तुमचा विद्यार्थी,नरसिंह राव, तुम्ही मला मॅथेमॅटिक्स शिकवायचे. सर म्हणाले, मला तुझा अभिमान वाटतो.ही वाक्यं ऐकण्याकरिता मी पाठीमागे उपस्थित होतो.मी ते जवळून पाहिले आहे. पुन्हा ते व्यासपीठावर गेलेत. एवढा सुसंस्कृतपणा त्यांच्याकडे होता.त्याचप्रमाणे ते संगीताचे अतिशय व्यासंगी होते, संगीताचे जाणकार होते.प्रो.राम मेघे त्यावेळेला आपल्या राज्यामध्ये मंत्री होते.कार्यक्रम संपल्यानंतर मला राव साहेब म्हणाले,उल्हास आपल्याला संध्याकाळी समारंभानंतर तास दीड तास वेळ आहे, तेव्हा आपल्याला एखादी उत्तम सतार ऐकता येईल काय? चांगले गायन ऐकता येईल काय? मी ताबडतोब आमचे एक मित्र केसकर नावाचे होते त्यांचा मुलगा अतुल केसकर हा पुणे आकाशवाणीवर उत्तम सतार वाजवायचा, तो आता जर्मनीमध्ये आहे.त्याना फोन केला . नानासाहेब शिरगुटीकरांची मुलगी शशिकला शिरगुटीकर यांनी आणि केसकर यांनी सर्किट हाऊस वर दीड तास सतार आणि भावगितांचा कार्यक्रम आमच्या सर्वांसमोर,मेघे साहेब आणि राव साहेब यांच्यासमोर सादर केला.आपल्याला याचे आश्चर्य वाटेल.की,त्यावेळेला राव साहेबांनी,जोत्स्ना भोळे याच्या भावगितांची आठवण करुन दिली आणि सांगितले की,त्यांची भावगीते आपणाला आठवत असतील तर ती गाऊन दाखवावी. एवढेच नाही तर त्यांनी सांगितले की,ज्यावेळेला ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये आले त्यावेळेला दर महिन्याला तीन रुपये आमच्याकरिता खर्चाकरिता यायचे आणि यातून जेवण वगैरे करुन महिन्याला एक रुपया आम्ही वाचवावयाचे आणि ते कशाकरिता तर त्यांना जोत्स्ना भोळे यांची भावगीते आणि बाल गंधर्वांची नाटके बघण्याची आवड होती आणि त्याकरिता ते दर महिन्याला तीन रुपयांतून एक रुपया वाचवावयाचे.त्यातून आठ आणे किंवा चार आण्याचे तिकीट काढून नाटकाला जाण्याची त्यावेळची त्यांची सवय होती असे ते म्हणाले. त्यांनी सांगितले की, जोत्स्ना भोळे जर असतील तर त्यांच्या घरी त्यांच्या भेटीला जाऊ.त्यांनी मो. ग. रांगणेकरांच्या नाटकांचा उल्लेख केला.एवढी सुंदर रसिकता त्यांच्याकडे होती आणि त्यानंतर मी त्यांच्याबरोबर जोत्स्ना भोळे यांना भेटायला गेलो. एवढे त्यांचे संगीत प्रेम होते. संगिताचा, साहित्याचा, कलेचा एवढा व्यासंगी माणूस. म्हणून जेव्हा ते कराडला साहित्य संमेलनाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार(पुढे सुरु..

उद्घाटला आले तेव्हा मला आनंद वाटला. कारण याच महाराष्ट्रामध्ये अखिल महाराष्ट्र मराठी साहित्य सम्मेलन झाले त्याचे उद्घाटन मा.श्री.नरसिंहराव यांच्या हस्ते ठरवीलेले होते पण राजकारण्यांनी साहित्य संमेलनात यावे की, येऊ नये या वादामुळे त्यांना येता आले नाही आणि ते आलेही नाहीत. मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, ह. ना. आपटेंच्या "पण लक्षात कोण घेतो" ही सामाजीक बंडखोर कादंबरी होती आणि त्री गाजलेली होती त्याचे तेलगू भाषांतर माननीय राव साहेबांनी केले होते. मराठी हिंदी,उर्दु,गुजराथी बंगाली,तेलगू,तामीळ, कन्नड भांषांवर त्यांचे प्रभुत्व होते.मी एक गंमत सांगतो.ते जेव्हा पंतप्रधान झाले तेव्हा हिरवळीवर सामान्य जनतेला एक तासभर पंतप्रधान भेटायचे.ही पूर्वीची परंपरा होती. एका बाजूला, महाराष्ट्रातील लोक, एका बाजूला आंध्र प्रदेशचे लोक, एका बाजूला पश्चिम बंगालमधील लोक त्यांना भेटायला यायचे. मी त्यांना एकदा भेटायला गेलो तेव्हा या सदनाचे माजी सदस्य श्री. रामदास फुटाणे साहेब माझ याबरोबर होते . मी त्यावेळेस पाहिले की,त्यांना भेटायला महाराष्ट्रातील लोक आले की, ते मराठीमध्ये बोलायचे.बंगालमधील लोक भेटायला गेले तर बंगालीमध्ये बोलायचे, तामिळनाडूतील शिष्टमंडळ भेटायला गेले तर तामिळमध्ये बोलायचे,तेलगू तर त्यांची मातृभाषा होती,उत्तर प्रदेश आणि बिहार,राजास्थानमधील मंडळींशी बोलतांना ते हिंदीतून बोलायचे आणि एखादे आमचे मुस्लिम बांधवाचे शिष्टमंडळ आले तर त्यंच्याशी ते उर्दुमध्ये बोलायचे.अशाप्रकारे विविध भाषांमध्ये बोलतांना मी पंतप्रधानांच्या हिरवळीवर त्यांना पाहिले. एवढे सुंदर बहुभाषांचे सामर्थ्य त्यांच्याकडे होते.आणखी एक सांगतो की,तलत महमूद यांच्या गझला राव साहेब अतिशय उत्तर प्रकारे गात होते.उत्तम हार्मोनियम ते वाजवित होते आणि वरंगळ जवळ जे त्यांचे गाव आहे त्या गावी गेल्यानंतर एक हॉबी होती की,शेतामध्ये जायचे, स्वत: ट्रक्टर चालवायचा आणि जमीन नांगरायची. थोरामोठयांच्या ज्या लकबी असतात त्याप्रमाणे मा.रावसाहबांची ही एक खासियत होती. असा एक उत्तम मनाचा, साहित्य,कला आणि सर्वांवर प्रेम करणारा, बहुभाषिक असा हा एक आदरणीय नेता होता. अतिशय अवघड काळामध्ये , या देशाची आर्थिक घडी अतिशय संकटामध्ये आली असतांना अतिशय संयमाने देश चालविण्याचे आणि या देशाच्या आर्थिक घडीला एक चांगले वळण देण्याच्या कामाचे नेतृत्व राव साहेबांनी केलेले आहे.अशा एका थोर नेत्याचा सहवास माझ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार(पुढे सुरु...

सारख्यांना लाभला. अशा कितीतरी आठवणी आहेत..या सर्व घटनांमध्ये त्यांचे उत्तुंग असे व्यक्तिमत्व तुम्हा आम्हाला खुलून दिसते.

यानंतर कु.थोरात...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

कऱ्हाडच्या साहित्य संम्मेलनात त्यांनी अतिशय उत्तम असे भाषण केले. त्यांनी एवढीच भावना व्यक्त केली की, मराठी साहित्यातील अनेक कादंबऱ्यांचे आणि कथांचे इतर भाषांमध्ये खूप भाषांतर झालेले आहे. पण मराठीत आवक किती झाली? जोपर्यंत इतर भाषांमधील उत्तम साहित्य मराठी साहित्यिक मंडळी आपल्या साहित्यात आणत नाहीत, तोपर्यंत भाषा समृध्द होत नाही. भाषा- भगिनी समृध्द होत नाही,अशा प्रकारची भावना त्यांनी, त्याठिकाणी व्यक्त केली होती. अशा या महान नेत्याच्या दु:खद निधनाबद्दलचा जो शोक प्रस्ताव माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी या ठिकाणी मांडलेला आहे, त्याला अनुमोदन देतांना, मी माझ्या विनम्र भावना व्यक्त करतो आणि भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन, मी माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : आदरणीय सभापती महोदय, आपल्या सदनाचे नेते, माननीय उपमुख्यमंत्री महोदय यांनी या देशाचे माजी पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंह रावजी यांच्या दु:खद निधनाबद्दलचा जो शोक प्रस्ताव याठिकाणी मांडलेला आहे, त्याच्याशी मी आपल्या सहसंवेदना व्यक्त करण्यासाठी उभा आहे. या देशाचा पंतप्रधान महाराष्ट्राचा व्हावा, अशी सर्वांची खूप इच्छा आहे. पण श्री. पी. व्ही. नरसिंह रावजीच्या रुपाने महाराष्ट्राने या देशाला एक प्रधानमंत्री दिला आणि त्यांच्या नेतृत्वाखाली ज्या पध्दतीने या देशाने वाटचाल केली, तो गौरव, महाराष्ट्राला पंतप्रधान श्री. नरसिंह रावजींच्या रुपाने प्राप्त झाला. त्यातही महत्वाची बाब अशी की, लोकसभेच्या निवडणुकीत आंध्र प्रदेशातून त्यांचा पराभव झाला असला तरी विदर्भाच्या भूमिने श्री. नरसिंह रावांना न्याय दिला. रामटेक लोकसभा मतदारसंघातून या देशाचे नेतृत्व करण्यासाठी विदर्भाच्या भूमिने श्री. नरसिंह रावजीच्या रुपाने एका खंबीर, बहुभाषिक, बहुगुणी, बहुआयामी अशा प्रकारचे व्यक्तिमत्व या देशाला देण्याचे काम केले. आमच्या सर्वच सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त करतांना त्यांच्या विविध गुणांचा या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. आंध्र प्रदेश राज्याची झालेली निर्मिती, आंध्र प्रदेश राज्याच्या राजकारणातील त्यांचे अत्यंत महत्वाचे स्थान, केंद्रीय राजकारणात त्यांचा
झालेला प्रवेश आणि देशाच्या सत्ताकारणामध्ये त्यांनी बाजवलेली भूमिका, ही इतिहासामध्ये निश्चितपणे नोंदवली जाईल, असे या ठिकाणी मला नमूद करावेसे वाटते. साहित्यिक भाषा प्रबळ असतात असे म्हणतात. पण श्री. नरसिंह रावजींचे विविध भाषांवर प्रभूत्व होते. त्यांची मातृभाषा तेलगू होती. पण तेलगू भाषे सोबतच मराठी, संस्कृत, हिंदी, तमिळ आणि उर्दू अशा अनेक भाषांवर त्यांचे प्रभूत्व होते. ते आंधप्रदेशचे मुख्यमंत्री असतांना असो की, या देशाचे प्रधानमंत्री असतांना असो, विविध राज्यातील विविध भाषिक मंडळी जेव्हा त्यांना भेटावयाला जायची तेव्हा त्यांच्या भाषेमध्ये त्या प्रतिनिधींसमवेत जेव्हा ते संवाद साधत होते, तेव्हा त्यांच्यामध्ये जो सुसंवाद आणि आपुलकी निर्माण व्हायची असे चित्र आपल्या देशात क्वचितच पाहावयास मिळते. हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे मोठे वैशिष्टय होते. अत्यंत संयमी अशा प्रकारचे व्यक्तिमत्व. साहित्य, संगीत आणि कला याबद्दल त्यांची असलेली आस्था, आमच्या अनेक मित्रांनी सांगितली. कऱ्हाडच्या साहित्य संमेलनाचे स्वागत अध्यक्षपद त्यांनी स्वीकारले आणि स्वत: तेलगू भाषिक असतांना देखील या

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे....

साहित्य संमेलनातून त्यांनी संदेश काय दिला? मराठी भाषा कुंठित होता कामा नये. मराठी भाषा विस्तृत झाली पाहिजे. मायमराठी भाषेचे अस्तित्व टिकले पाहिजे. ती वैभवशाली झाली पाहिजे. आणि त्यामुळे मराठी भाषेतील साहित्य इतर भाषांमध्ये जसे भाषांतरीत केले जाते,

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

इतर भाषेमधीलच नव्हे तर जगातील अनेक चांगले, उत्कृष्ट साहित्य मराठी भाषेमध्ये देखील आले पाहिजे आणि मराठी भाषा समृध्द झाली पाहिजे हे विचार त्यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये मांडले. त्यांनी मराठी भूमीत मराठी भाषेला दिलेला हा थेट संदेश आहे असे मी समजतो. या प्रसंगी सर्वांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. मोठया पदावर गेलेली माणसे हवेत उडावयास लागतात, आकाशाला हात लावण्याच्या प्रयत्नामध्ये जमिनीशी त्यांचा संबंध तुटून जातो. परंतु गगनाला गवसणी घालणारा माननीय श्री. नरसिंह रावांसारखा महामानव जमिनीशी नाते तुटू न देता सतत आकाशामध्ये भरारी घेत राहिला. हे त्यांच्या कर्तबगारीचे आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य सांगावे लागेल. सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार यांनी एक उल्लेख केला. सुखासाठी सर्व सोबत असतात, सत्तेसाठी सर्व सोबत असतात परंतु दु:खाच्या वेळी, संकटाच्या वेळी मित्रत्वाची आणि विश्वासाची जी खरी परीक्षा व्हावयाची असते त्या परीक्षेच्या वेळी मात्र अनेकांनी त्यांची साथ सोडल्याचे दु:ख सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार यांनी व्यक्त केले. त्यांच्या मनात ते शल्य असेलही पण असे असताना आपला तोल ढळू न देता भारतीय राजकारणामध्ये खंबीरपणे, माननीय श्री. राजीव गांधी यांच्या दु:खद निधनानंतर या देशाची जबाबदारी सांभाळण्याचे जे काम त्यांनी केले ते त्यांनी केलेले काम कदापिही विसरता येणार नाही. त्यांच्यावर अनेक प्रकारचे आरोप झाले. त्याच्या तपशिलात शिरण्याचा आजचा प्रसंग नाही. परंतु ज्यावेळी बाबरी मशीद उध्वस्त करण्यात आली अशा दुर्दैवी प्रसंगी मात्र श्री. नरसिंह राव हे आमच्या देशाचे पंतप्रधान होते आणि त्यांच्यावर हा आरोप करण्यात आला की, ज्याप्रमाणे रोम जळत असताना निरो फिडेल वाजवित बसला होता त्याप्रमाणे बाबरी मशीद तुटत असताना श्री. नरसिंह राव टी.व्ही. पहात बसले होते असे वर्णन वर्तमानपत्रांमध्ये आले होते. अशा प्रकारचे अनेक आरोप प्रत्यारोप झाले परंतु या सर्व आरोप प्रत्यारोपांना समर्पक उत्तर देऊन या देशाला आर्थिक, सामाजिक दिशा देण्याचे काम त्यांच्या कालखंडामध्ये, त्यांच्या नेतृत्वाखाली झाले हे विसरता येत नाही. शेतकऱ्यांच्या, गरिबांच्या, दलितांच्या, कष्टकऱ्यांच्या आणि उपेक्षित समाज समुहाच्या उत्थानासाठी त्यांनी जी भूमिका घेतली ती भूमिका या देशातील "हॅवज्-नॉट" वाले

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे .....

ज्यांना म्हणतो ती नाहीरे वाली तमाम जनता कदापिही विसरु शकणार नाही. या सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी त्यांच्या निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याच्याशी सहमती दर्शवून दिवंगत माजी पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंह राव यांच्या स्मृतीस माझ्या वतीने आणि माझ्या पिपल्स रिपब्लीकन पक्षाच्या वतीने विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : माननीय सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटीलजी यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावाशी मी माझ्या सहसंवेदना व्यक्त करीत आहे.

आदरणीय कै.पी.व्ही.नरसिंह रावजी यांच्याबद्दल काय बोलावे ? अत्यंत बुध्दीमान, कार्यकुशल, राजकारण धुरंधर, प्रभावी व्यक्तिमत्व, अनेक भाषांवर प्रभुत्व असलेले भाषा प्रभू, प्रचंड प्रशासकीय अनुभव असलेले कुशल प्रशासक अशा सर्व विशेषणांना सार्थ करणारे होते कै.नरसिंह राव ! आंध प्रदेशच्या मंत्री पदापासून ते मुख्यमंत्रीपदापर्यंत सगळी पदे त्यांनी भुषविली. तसेच केंद्रामध्ये विविध खात्याची मंत्रीपदे भुषवून प्रत्येक खात्यावर आपला अमीट ठसा उमटवला. मला आठवते, मी त्यावेळी खासदार होते. कै.रावसाहेब त्यावेळी केंद्रीय मानव संसाधन मंत्री होते. नवे शैक्षणिक धोरण हे संसदेमध्ये मांडले गेले होते. त्यावेळी राज्यसभेमध्ये भरपूर चर्चा झाली होती. त्या चर्चेला कै.रावसाहेबांनी दिलेले उत्तर अविस्मरणीय होते. त्यांनी त्या चर्चेला तब्बल 90 मिनिटे उत्तर देणारे भाषण केले. त्यांनी नवीन शैक्षणिक धोरणाची उकल करुन चर्चेला समर्पक उत्तर देऊन सर्व टीका आणि शंकांचे निरसर केले. ते त्यांचे भाषण त्यांच्या काही अप्रतिम भाषणांपैकी एक होते. अजूनही मला आठवते की, अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये त्यांनी देशाच्या पंतप्रधानपदाची धुरा सांभाळली होती. राजीवजींच्या मृत्यूमुळे सारा देश आणि विशेषत: कॉंग्रेसजन अपार दु:खसागरात बुडाले होते. राजकीय परिस्थिती ही थोडीबहुत अस्थितरच होती. निर्विवाद बहुत कोणत्याच पक्षाला मिळाले नव्हते. त्यात भरीत भर म्हणजे देश अत्यंत बिकट आर्थिक समस्यांचा सामना करीत होता. जुनी अर्थव्यवस्थेची चौकट मोडून आर्थिक सुधारणा आणि उदारीकरणाचे धोरण स्वीकारुन अर्थव्यवस्थेला नवीन चालना देण्याची अत्यंत निकड होती. आजचे पंतप्रधान आणि त्यावेळचे अर्थमंत्री मा.डॉ.मनमोहन सिंगजी यांच्या साथीने उदारीकरणाच्या नवीन धोरणाचा भक्कम पाया कै.रावसाहेबांच्या कारकिर्दीत घातला गेला आणि त्याचीच मधुर फळे आता आपल्याला चाखायला मिळत आहेत. उदारीकरण करताना गरीब माणूस, आम आदमी डोळयासमोर ठेवून, त्याच्या समस्या लक्षात घेऊन धोरण आखले गेले. स्वित्झर्लंडमध्ये डाव्होस येथे आंतरराष्ट्रीय शिखर परिषदेत उदारीकरणामध्ये मध्यम मार्ग कसा हाताळावा याचे सुंदर विवेचन कै.रावसाहेबांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी..

केले होते. तोच त्यांनी या धोरणाला दिलेला मानवी चेहरा होता. ज्याचा नंतरच्या एनडीए सरकारला थोडासा विसर पडला होता. कै.रावसाहेब मराठी अतिशय उत्तम बोलायचे, महाराष्ट्रातील खासदार म्हणून त्यांना माझ्याबद्दल आत्मियता होती. ते परराष्ट्र मंत्री असताना बरेच परदेशी पाहुणे अगदी विविध देशांच्या राष्ट्रपतींपासून अनेक बडे पाहुणे येत असत. काही खासदारांना त्यांच्यासमवेत भोजनाचे आमंत्रण असे. अशा अनेक भोजन समारंभांना कै.रावसाहेब मला आवर्जून बोलवित असत. विविध राज्यांच्या विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांना पक्षाची निरीक्षक म्हणून मी जात असे आणि अजूनही जाते. कै.रावसाहेब पंतप्रधान आणि काँग्रेसचे अध्यक्ष होते. 1993 साली मध्य प्रदेशची निरीक्षक म्हणून मी गेले होते. भोपाळला कै.रावसाहेबांची पब्लिक मिटिंग होती. मिटिंग संपल्यावर एकंदर मध्य प्रदेशच्या परिस्थितीबाबत मी त्यांना रिपोर्ट दिला आणि काहीजण पक्षविरोधी कारवाया कशा करत आहेत ते सांगितले. तेव्हा ते म्हणाले की, मला या गोष्टीची शंका होतीच म्हणूनच मी तुम्हाला तेथे नजर ठेवावयास पाठविले. त्यावेळी सगळया काँग्रेसजनांना एकत्रित कामाला लावण्याचे कठीण काम आम्हाला करावे लागले.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती सुधा जोशी पुढे सुरु...)

आणि काँग्रेसला जेव्हा बहुमत मिळाले त्यावेळी श्री. दिग्विजय सिंग यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे सरकार स्थापन झाले. त्यावेळी नरसिंव रावसाहेबांची शाबासकी मिळाली. मध्यंतरी माझ्या मुलीच्या लग्नाचे आमंत्रण देण्यासाठी मी त्यांच्याकडे गेले होते. त्यांचे खाजगी सचिव श्री. खांडेकर यांनी मला सांगितले की, "साहेब नुकतेच झोपले आहेत, तुम्ही 4.00 वाजता या. तुम्हाला भेटून त्यांना खूप आनंद होईल." परंतु मला 4.00 वाजताच्या राजधानीने परत मुंबईला यावयाचे होते. त्यामुळे मी श्री.खांडेकर यांच्याकडे निमंत्रण देऊन निघाले. श्री. खांडेकर म्हणाले, "पुढच्या वेळेस आलात की, साहेबांना जरुर भेटायला या, त्यांना बंर वाटेल." पण ती पुढची वेळ दुर्दैवाने आलीच नाही. तत्पूर्वीच ते आपल्याला सोडून गेले. त्यांनी माझ्या मुलीला आणि जावयांना आशीर्वाद देणारे मराठीत अतिशय सुंदर असे वैयक्तिक पत्र पाठविले होते. मला वाटते ते त्यांच्या निधनापूर्वी लिहिलेल्या काही शेवटच्या पत्रांपैकी एक असावे. कै. नरसिंह रावसाहेब हे खरोखरच सगळयांनाच जवळचे असे वाटायचे. आपल्यातून ते निघून गेलेले आहेत. मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजी वाहते.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील साहेबांनी आपल्या देशाचे नेते कै. पी.व्ही. नरसिंह राव यांच्या निधनाबद्दल या सदनामध्ये जो दुखवटा प्रस्ताव मांडलेला आहे त्याला माननीय विरोधी पक्ष नेते आणि अन्य माननीय सदस्यांनी पाठिंबा दिलेला आहे. कै. पी.व्ही. नरसिंह राव हे देशाला लाभलेले एक अष्टपैलू नेतृत्व. देशामध्ये आदर्श व्यक्तिमत्व कसे असू शकते, कोणत्या पध्दतीचा त्याग ते करु शकते याचे कै.पी.व्ही.नरसिंहराव हे मूर्तिमंत उदाहरण आहे. विद्यार्थी दशेमध्ये असताना एका अत्यंत जिद्दीने, त्यागमय जीवन जगण्याने प्रेरित झालेले, हैद्राबाद मुक्ती संग्राम चळवळ सुरु झाली त्यावेळी, माध्यमिक शाळेमध्ये "वंदे मातरम्" म्हणणारा एक चळवळ्या विद्यार्थी म्हणजे पी.व्ही. नरसिंहराव. त्यावेळच्या हैद्राबाद मुक्ती संग्रामामधील एक तेजस्वी तारा आंध्रप्रदेशमधील हैद्राबादमध्ये चमकला आणि त्यानंतर आपल्या बौध्दिक कौशल्यामुळे संपूर्ण देशामध्ये एक प्रभावी आणि मुत्सदी नेता म्हणून त्यांनी आपली एक वेगळी प्रतिमा तयार केली. कै. नरसिंह रावांना मी 4 वर्षे जवळून पाहात होतो. मी 1992मध्ये जेव्हा प्रदेश काँग्रेसचा अध्यक्ष झालो त्यावेळी ते अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष होते आणि भारताचे पंतप्रधानही होते. राजकीय, सामाजिक तसेच आर्थिक क्षेत्रातील काही मुद्यांवर राष्ट्रीय पातळीवर होणारी चर्चा सातत्याने ऐकावी, ती समजून घ्यावी आणि त्यानुषंगाने राज्यातील तसेच स्थानिक पातळीवरील परिस्थिती त्यांना सांगण्यासाठी कधी एकदाची संधी मिळते याची वाट पाहणारा मी त्यावेळचा एक कार्यकर्ता. कै. नरसिंह राव हे अत्यंत मितभाषी होते असे म्हटले तर काही वावगे होणार नाही. परंतु सर्वांचे म्हणणे ऐकून घेल्यानंतर परखड मत मांडणारे ते होते. अशा प्रकारचे त्यांचे व्यक्तिमत्व मी 4 वर्षे बघितले. त्यांच्या जीवनाचा आलेख आपण डोळ्यासमोर ठेवला तर, विद्यार्थी दशेमध्ये सर्वस्वाचा त्याग करणारा हा त्यावेळचा विद्यार्थी. विद्यार्थी दशेत असतानाच त्यावेळच्या हैद्राबाद संस्थानाने त्यांना कॉलेजमधून काढून टाकले. रस्टीकेट केले. त्यानंतर ते नागपूरला आले. त्यावेळच्या कुलगुरुंनी त्यांना विशेष बाब म्हणून प्रवेश दिला. त्यानंतरही ते हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या चळवळीत भाग घेत राहिले आणि त्यानंतरच्या काळामध्ये त्यांनी काही प्रमाणात आपले शिक्षण पूर्ण केले.

...नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

मा. सभापती (पुढे सुरु...)

मघाशी सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी उल्लेख केल्याप्रमाणे त्यानंतरच्या काळामध्ये फर्ग्युसन कॉलेजमध्ये त्यांनी बी.एस.सी. पर्यन्त शिक्षण घेतले. अत्यंत कुशाग्र बुध्दिचा विद्यार्थी, अत्यंत कुशाग्र बुध्दिचा तरुण नेता असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. संघर्षामध्ये वाढलेले श्री.नरसिंह रावजी वयाच्या 21-22 व्या वर्षी नवीन निर्माण झालेल्या आंध्रप्रदेशमधील तरुण आमदार होते. ते 1956-57 ते 1977 च्या दरम्यान आंध्र प्रदेशात अत्यंत तरुण वयात अनेक विभागाचे मंत्री झाले. त्यानंतर वयाच्या 34-35 वर्षी ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री झाले. 1971 ते 1973 या दरम्यान आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. मुख्यमंत्री असताना सुध्दा त्यांचे विचार क्रांतिकारक असे होते. अशा प्रकारचे विचार असतानाही "नाही रे" चे प्रतिनिधीत्व करणे किती कठीण असते याचे अत्यंत महत्वाचे उदाहरण म्हणजे महाराष्ट्रात 1956-57 या वर्षी "कसेल त्याची जमीन " अशा पध्दतीचा कायदा केला गेला. तेव्हा अनेकांना असे वाटावयाचे की, "कसेल त्याची जमीन" हे नाव घेणे सुध्दा कठीण आहे. त्यावेळी आंध्र प्रदेशात तेलंगणाची जी काही परिस्थिती होती त्यासंबंधीची माहिती सगळयांना आहे. नंतरच्या काळात आंध्र प्रदेशात अनेक पध्दतीचे लढे उभारले गेले. तरीही श्री.नरसिंह रावजींनी विचाराच्या दृष्टीने तसूभरही बाहेर न जाता त्यांनी अशा परिस्थितीमध्ये महाराष्ट्राच्या नंतर 1971 ते 1973 या काळात "कसेल त्याची जमीन" हा पहिला कायदा आंध्र प्रदेशात आणला. नंतरच्या काळात केंद्र सरकारमध्ये, राष्ट्रीय पातळीवर त्यांच्या बौध्दिक क्षमतेची गरज दिसून आली तेंव्हा राज्याच्या व राष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने त्यांना राष्ट्रीय पातळीवर त्यांना काम करण्याची संधी दिली गेली. कै. इंदिरा गांधी, कै.राजीव गांधी यांच्या काळात त्यांनी राष्ट्राची चांगली सेवा केलेली आहे. जवळ जवळ 20 वर्षे त्यांनी राष्ट्राची अत्यंत उत्तम सेवा केलेली आहे तसेच त्यांनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रातही अतिशय उत्तम काम केलेले आहे. 1992 साली त्यांनी मानसिकदृष्टया पक्के ठरविले होते की, आता राजकीय जीवनातून हैद्राबाद येथे जावयाचे आणि त्या ठिकाणी जाऊन आपले उर्वरित जीवन ज्या अन्य विविध बाबी आहेत त्या बाबींच्या माध्यमातून राष्ट्रासाठी अर्पण करावयाचे. ज्यावेळेला श्री.राजीव गांधी यांचा दुर्देवी मृत्यू झाला त्यावेळी जी परिस्थिती निर्माण झाली होती, त्या परिस्थितीत देशातील सामान्य माणसांनी त्यांना दिल्लीमध्ये थांबविले. राष्ट्रीय पातळीवरील कॉंग्रेस पक्षाने त्यांना दिल्ली येथे थांबविले. त्यानंतर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मा.सभापती (पुढे सुरु...)

किमान पाच ते साडेपाच वर्षे या देशाचे पंतप्रधान झाले. देशाच्या त्यावेळच्या आर्थिक परिस्थितीचा आपण सहज विचार केला तर त्यावेळी देशाची आर्थिक परिस्थिती डबघाईस आलेली होती. त्यावेळी त्यांनी आताचे पंतप्रधान माननीय डॉ. मनमोहन सिंग यांना अर्थमंत्री म्हणून नियुक्त केले. त्यावेळेला आर्थिक परिस्थितीचा विचार करुन काही चांगल्या योजना त्यांनी अत्यंत धाडसाने राबविल्या. नवीन आर्थिक योजना राबविल्यामुळे काही ठिकाणी त्यांच्या बाबतीत टीकाटिप्पणीही झाली. त्यावेळी मी प्रदेश कॉग्रेसचा अध्यक्ष असताना दिल्ली येथे जात असे. अनेक वेळा त्यांचे बरोबर माझ्या बैठका झाल्या. त्या बैठकीत मी त्यांचे भाष्य ऐकले आहे. ते बैठकीत कमी बोलत असत. काही वेळा बैठकीत ते अत्यंत मार्मिक बोलत असत. एका विषयाच्या संदर्भात त्यांचे समवेत माझी चर्चा होती. त्या चर्चेच्या वेळी त्यांनी सांगितले की, एखादा विजय झाला, अनुकूल असा निष्कर्ष आला, निकालात अचूक निर्णय झाला, एखाद्या विषयाच्या बाबतीत हिमालयाएवढे यश मिळाले तर त्या यशाचे मालक लाखो असू शकतात. परंतु सगळया प्रकारचे प्रयत्न करुनही दुर्देवाने अशा पध्दतीचे यश मिळविण्यात अपयशी ठरलो तर ते अपयश जणू काही बेवारशी आहे, अशा पध्दतीने जे निर्णय घेतले जातात त्यास कोणी मालक नसतो अशी परिस्थिती या देशामध्ये आहे. त्याकाळात श्री.नरसिंह रावजींना नाईलाजाने अशा प्रकारचे काही निर्णय घ्यावे लागले असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

यानंतर श्री. उपरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती)

ते अत्यंत मुत्सद्दी होते. विद्यार्थी दशेपासून शेवटच्या क्षणापर्यंत आपल्या विचारांच्या अनुषंगाने लढणारे होते. या देशातील एक विचारवंत म्हणून नरसिंह रावजींनी अखंड आपल्या देशाची सेवा केली. दुर्दैवाने 23 डिसेंबर 2004 रोजी त्यांचे दु:खद निधन झाले. तरी परमेश्वराला माझी एवढीच प्रार्थना आहे की, परमेश्वराने त्यांना चिरशांती द्यावी. तसेच या देशातील जी जनता आहे, जी तरुण पिढी आहे त्या तरुण पिढीलासुध्दा एक प्रेरणा मिळावी. त्यांनी असा विचार जोपासला होता की, आपला केंद्रबिंदू हा गरीब आहे, उपेक्षित आहे. त्यामुळे त्या गरीब आणि उपेक्षित सामान्य माणसांसाठी या देशातील तरुण पिढी पुढील काळात राबली तरच ख-या अर्थाने नरसिंह रावजीना ती श्रध्दांजली होईल असे मला वाटते.

सन्माननीय सभासदांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SDU/ KGS/ MHM.

पृ.शी./मु.शी. : औचित्त्याच्या मुद्याबाबत.

श्री.संजय सतीशचंद्र दत्त : सभापती महोदय, अंबरनाथचे 43 विद्यार्थी इयत्ता दहावीच्या परीक्षेपासून वंचित राहणार आहेत. त्यासंबंधी मला औचित्त्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे.

सभापती : या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते आणि श्री.जितेंद्र आव्हाड यांनीही मला कळविले आहे. तरी आपण मला माझ्या दालनात भेटावे.

सभागृहापुढील दिवसाचे कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 15 मार्च 2005 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 7 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 15.3.2005 च्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही